464

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व. का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १३/१२/२०२४

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. प्रानिमं १२२४/ प्र.क्र.११६/ का.सेवा-४, दि.१०/१२/२०२४.

**विषय** :- राज्य शासनाच्या अखत्यारितील सर्व शासकीय कार्यालयातील गट-ब (अराजपत्रित) व गट-क ( वाहन चालक वगळून ) संवर्गातील पदे सरळसेवेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याबाबतच्या कार्यवाहीची प्रमाणित कार्यपध्दती (SOP) प्रसिध्द करणेबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. प्रानिमं १२२४ / प्र.क्र.११६ / का.सेवा-४, दि. १०/१२/२०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१२१०१२३५११७१०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना / आर्थिक गुन्हे / नियोजन व समन्वय / दहशतवाद विरोधी पथक / विशेष कृती / लोहमार्ग / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / रा.रा.पो.बल ), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर सुरक्षा / नागरी हक्क संरक्षण / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग / व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता / धोरण / नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी का .क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**राज्य शासनाच्या अखत्यारितील सर्व शासकीय कार्यालयातील गट-ब (अराजपत्रित) व गट-क (वाहन चालक वगळून) संवर्गातील पदे सरळसेवेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याबाबतच्या कार्यवाहीची प्रमाणित कार्यपध्दती (SOP) प्रसिध्द करणेबाबत ...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: प्रानिमं १२२४/प्र.क्र.११६/का.सेवा-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १० डिसेंबर, २०२४.

**वाचा :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : प्रानिमं १२२४/प्र.क्र.७०/सेवा-४(का.१३-अ), दिनांक १८ जुलै, २०२४.

**<u>प्रस्तावना</u>: -**

राज्य शासनाच्या सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-ब (अराजपत्रित) व गट-क (वाहन चालक वगळून) संवर्गातील सर्व पदे सरळसेवेने टप्प्याटप्प्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यास संदर्भाधीन दिनांक १८/०७/२०२४ च्या शासन निर्णयाद्वारे तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांनुसार, उपरोक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यासंदर्भातील प्रमाणित कार्यपध्दती (Standard Operating Procedure) **प्रसिध्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.**

**<u>परिपत्रक</u>** :-

राज्य शासनाच्या सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-ब (अराजपत्रित) व गट-क (वाहन चालक वगळून) संवर्गातील सर्व पदे आयोगाच्या कक्षेत टप्प्याटप्प्याने आणणे तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सक्षमीकरण करणे याकरीता शासन व आयोग यांच्यामध्ये समन्वय राखण्यासाठी अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग | सदस्य |
| ३ | सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग | सदस्य |
| ४ | सह सचिव/उप सचिव (मलोआ/सामान्य प्रशासन विभाग) | सदस्य |
| ५ | सह सचिव/उप सचिव (कार्यासन सेवा-४/सामान्य प्रशासन विभाग) | सदस्य सचिव |

२. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत आणावयाचे पदांचे प्रस्ताव उपरोक्त समितीपुढे शिफारशीसाठी सादर करावयाचे आहेत. तद्नंतर विभागांना पदे आयोगामार्फत भरता येणार आहेत. या अनुषंगाने, मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी करावयाच्या कार्यवाहीची प्रमाणित कार्यपध्दती (Standard Operating Procedure) पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रमाणित कार्यपध्दती |
|---|---|
| १ | मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत आणावयाच्या पदांचे विहित प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग/सेवा-४ कार्यासनाकडे सादर करावेत. |
| २ | मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झालेले विहित नमुन्यातील प्रस्ताव एकत्रितरित्या समन्वय समितीकडे शिफारशीसाठी सामान्य प्रशासन विभाग/सेवा-४ कार्यासनामार्फत सादर करण्यात येतील. |
| ३ | सदर समिती कोणती पदे प्रथम टप्प्यात प्राधान्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे वर्ग करावयाची याबाबत शिफारस करेल. तसेच पुढील टप्प्यात कोणती पदे आयोगाकडे वर्ग करावयाची आहेत याबाबत समिती वेळोवेळी शिफारस करेल. |
| ४ | समन्वय समितीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे वर्ग करावयाच्यापदांची शिफारस केल्यानंतर , पदे आयोगाच्या कक्षेत आणण्याची पुढील आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना सामान्य प्रशासन विभाग/ सेवा-४ कार्यासनामार्फत मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना देण्यात येतील. |
| ५ | समन्वय समितीने शिफारस केलेली पदे आयोगाच्या कक्षेत आणण्यासाठी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (विचारविनिमयापासून सूट) विनियम, १९६५ च्या नियम ३ सोबतच्या अनुसूचीमधील क्रमांक ३३ मध्ये आवश्यक दुरुस्ती करण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग/का.८(मलोआ) कडे स्वतंत्र प्रस्ताव संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने सादर करावा. |
| ६ | सदर पदांचे सुधारित सेवा प्रवेश नियम विहित करण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग/का.१२ (सेवा-१/सेवा-२/सेवा-३) व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी सल्लामसलत करुन संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने स्वतंत्ररित्या करावी. |
| ७ | पदे आयोगाच्या कक्षेत आणण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (विचारविनिमयापासून सूट) विनियम, १९६५ च्या नियम ३ सोबतच्या अनुसूची मधील क्रमांक ३३ मध्ये दुरुस्ती व पदांचे सेवाप्रवेश सुधारित करणे ही कार्यवाही झाल्यानंतर, पदे सरळसेवेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरताना आयोगाकडे मागणीपत्र पाठविणे तसेच आयोग व मंत्रालयीन प्रशासकीय विभागस्तरावरील कार्यवाहीबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक :प्रानिमं १२२०/६२/प्र.क्र.३०/का.१३-अ, दिनांक ०२/११/२०२२ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी कार्यवाही करावी. |
| ८ | महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत आणलेल्या गट-ब (अराजपत्रित) व गट-क (वाहन चालक वगळून) पदांसाठी यापूर्वी लागू असलेले आरक्षण धोरण व अनुषंगिक सोयी-सवलती यापुढेही लागू राहतील. |

३. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२४१२१०१२३५११७१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUCHITA MOHAN MAHADIK

Digitally signed by SUCHITA MOHAN MAHADIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=6578e224c4a0d2c9bfb7e7e33b474757c1425d0a03e653bc4f0a25b70698158e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E146A6DDC8FB6681D49A5099661D41639DA6C568419F071BB9CDFD8A2E08058C, cn=SUCHITA MOHAN MAHADIK
Date: 2024.12.10 12:36:39 +05'30'

**( सु. मो. महाडिक )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
३) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,

४) सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना)- त्यांनी हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.
५) *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
६) *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
७) *प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
८) *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
९) * सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१०) *राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
११) *सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१४) मुख्य लेखापरीक्षक (निवासी लेखे), कोकण भवन, नवी मुंबई,
१५) सर्व विभागीय आयुक्त,
१६) सर्व जिल्हाधिकारी,
१७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१८) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई
२०) सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख- (मंत्रालयीन विभागामार्फत),
२१) मंत्रालय मध्यवर्ती ग्रंथालय, मंत्रालय, मुंबई (२ प्रती)
२२) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
२३) निवडनस्ती.

*पत्राने*

****